# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES**

म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४

Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.

**Phone:** 0253-2539176 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176

**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com


क्रं.मआविवि/पीआर/७१८/२०११ <u>**वृत्त प्रसिध्दीसाठी**</u> दि. २२ जुलै २०११

**<u>महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा बी.पी.एम.टी. अभ्यासक्रम</u>**

## "पॅरामेडिकल क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची मोठी गरज"

**– मा.कुलगुरु प्रा.डॉ.अरुण जामकर**

**नाशिक (दि.२२) :** पॅरामेडिकल हे क्षेत्र सध्याच्या काळात व्यापक होत असून नजिकच्या भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर या क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची मागणी रहाणार असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा.डॉ. अरुण जामकर यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती देतांना मा. कुलगुरु यांनी सांगितले की, शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन यांच्या परवानगीने समाजाची गरज ओळखून आणि आरोग्य सेवेविषयक अधिक प्रगतीसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे तीन वर्षे कालावधीचा बॅचलर ऑफ पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी हा अभ्यासक्रम विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, खाजगी शिक्षण संस्था, खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सुरु करण्यात आले असल्याची माहिती दिली.

आरोग्य विद्याशाखांच्या अभ्यासक्रमांमध्ये पॅरामेडिकल हेल्थ सायन्सेस या विषयांना सध्याच्या काळात विशेष महत्व प्राप्त झाले आहे. आरोग्य क्षेत्रात होणारे नवनवे बदल पाहून त्याबाबतचे ज्ञान विद्यार्थ्यांना देण्यासाठी आरोग्य विद्यापीठातर्फे या नव्या पदवी अभ्यासक्रमांचा प्रारंभ करण्यात आला आहे. वैद्यकीय व्यवसायात वैद्यकीय तंत्रज्ञानाचे महत्व दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. त्यामुळे वैद्यकीय तज्ज्ञांना देखील तंत्रज्ञांची आवश्यकता भासू लागली आहे. वैद्यकीय क्षेत्रात निर्माण झालेली कुशल मनुष्यबळाची गरज ओळखून विद्यापीठातर्फे हे नवे अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहे. हे सर्व अभ्यासक्रम पदवी स्तरावरचे असून यामुळे विद्यार्थ्यांना पदवीधारक होता येते. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग (M.P.S.C.), केंद्रीय लोकसेवा आयोग (U.P.S.C.) अशा विविध स्पर्धा परीक्षांसाठी देखील हे विद्यार्थी पात्र ठरतात. तरीही विद्यार्थ्यांनी या संधीचा जरुर लाभ घ्यावा असे आवाहन मा. कुलगुरु यांनी केले.

बॅचलर ऑफ पॅरामेडिकल टेक्नोलॉजी (BPMT) पदवी अभ्यासक्रमांमध्ये लॅबोरॅटरी टेक्निशिअन (Laboratory Technician), रेडिओग्राफीक (Radiographic Technician), रेडिओथेरपी टेक्निशिअन (Radiotherapy Technician), कार्डिओलॉजी टेक्निशिअन (Cardiology Technician), न्यूरोलॉजी टेक्निशिअन (Neurology Technician), ब्लड ट्रान्सफयूजन टेक्निशिअन

(Blood Transfusion Technician), ऑप्टोमेट्री टेक्निशिअन (Optometry Technician), प्लॅस्टर टेक्निशिअन (Plaster Technician), अॅनेस्थेसिया टेक्निशिअन (Anaesthesia Technician), परफयुजनिस्ट टेक्निशिअन (Perfusionist Technician), ऑपरेशन थिएटर टेक्निशिअन (Operation Theatre Technician), मेडिकल ट्रान्सक्रिप्शन (Medical Transcription), सायटो-टेक्निशिअन (Cyto-Technician), हिस्टोपॅथोलॉजी टेक्निशिअन (Histopathology Technician), ट्रान्सफयुजन मेडिसिन टेक्निशिअन (Transfusion Medicine Technician), क्लिनिकल सायकोलॉजिस्ट टेक्निशिअन (Clinical Psychologist Technician), एन्डोस्कॉपी टेक्निशिअन (Endoscopy Technician), कम्युनिटी मेडिसिन/हेल्थ इन्स्पेक्टर/इमर्जंसी मेडिकल सर्विसेस (Community Medicine/Health Inspector/Emmergency Medical Service), फॉरेन्सिक सायन्स (Forensic Science) अशा विविध अभ्यासक्रमांचा समावेश आहे. सामाजिक गरज लक्षात घेऊन या अभ्यासक्रमांना विद्यापीठातर्फे पुढाकार घेऊन सुरु केलेला आहे. या अभ्यासक्रमांचे वैशिष्टये म्हणजे कुशल मनुष्यबळाची जी गरज आज मोठया रुग्णालयांना भासत आहे ती पूर्ण होऊ शकेल. याचबरोबर क्लिनीकल सायकोलॉजिस्ट, हिस्टोपॅथोलॉजी या सारख्या विषयांमध्ये पदवी शिक्षण घेतल्यानंतर स्वयंरोजगाराची वाट देखील निवडता येऊ शकते. ग्रामीण भागात वैद्यकीय तज्ञ वेळेप्रसंगी उपलब्ध होत नाही अश्या वेळेस कम्युनिटी मेडिसीन/हेल्थ इन्स्पेक्टर या पदवी अभ्यासक्रमानंतर हे विद्यार्थी तज्ञ डॉक्टर उपलब्ध होईपर्यंत अत्यावश्यक सेवा देऊ शकतात.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आ.ना.सूर्यकर यांनी सांगितले की, सदर अभ्यासक्रमांना बारावी विज्ञान शाखेच्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र विषय घेऊन उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. याविषयीच्या अधिक माहितीसाठी आपल्या जवळील वैद्यकीय महाविद्यालयांशी संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले आहे.

Asuryakar

कुलसचिव